# संपादकीय

जालियनवाला बागेतील इंग्रजी राजवटीने केलेले मानवी हत्याकांड भारतीय जनतेच्या स्मृतीतून नाहीसे होणे शक्य नाही. भारतीयांनी इंग्रज राजवट नष्ट करण्यासाठी चालविलेली चळवळ दडपून टाकण्याचा सर्वतो प्रयत्न इंग्रज राज्यकर्ते करत होते आणि म्हणून १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बागेमध्ये जमलेल्या लोक समुदायावर इंग्रज पोलिसांनी निर्घृण गोळीबार केला. शेकडो लोक मृत्युमुखी पडले. बोलून चालून ती परकी राजवट. आपली राजवट, आपले साम्राज्य भारतामध्ये टिकविण्यासाठी सर्व भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब इंग्रजांनी केला. पण समाजवादी लोकशाहीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवणाऱ्या स्वतंत्र भारतामध्ये एखादी चळवळ दडपण्यासाठी जालियनवाल्या बागेतल्या घटनेची पुनरावृत्ती केली जाईल हे कल्पनेतही शक्य वाटत नव्हते. पण आज ते एक विदारक सत्य बनले आहे. बरोबर ५९ वर्षानंतर म्हणजे १३ एप्रिल १९७८ रोजी जलियनवाला बागेतील घटनेची पुनरावृत्ती झाली. आपल्याच सरकारने आपल्याच लोकांचे केलेले हत्याकांड. उत्तर प्रदेशातील नैनिताल जिल्ह्यातील पंतनगरमधील कृषी विद्यापीठात घडलेली ही घटना. पोटापाण्याची पुरेशी आणि कायमची व्यवस्था व्हावी म्हणून शेतमजूरांनी आग्रह धरला व संघटित प्रयत्न सुरू केले हाच त्यांचा गुन्हा आणि त्याला शिक्षा काय ? न्यायालयात खटले भरून ठरविलेली नव्हे ! तर डी. डी. टी. चा फवारा मारून ढेकुन, मुंग्या माराव्या त्याप्रमाणे बंदुकीच्या फैरी झाडून पोलिसांनी माणसे टिपली; आगीत फेकून दिली. अन्न, वस्त्र, निवारा या किमान गरजाही ज्यांना भागविना येत नाहीत असे हे मानवी 'किडे' ! त्यांच्या जनन–मरणाचे दुःख कोणाला ! वरील अत्याचाराची घटना अपवादात्मक नाही. असे अत्याचार घडोघडी उच्च वर्गातील लोकांकडून दलित, कष्टकरी, कनिष्ट समाजातील लोकांवर होत आहेत. या गरीब लोकांची घरेदारे जमिनी लुटणे, जाळणे, त्यांच्या बायका-पोरांना मारहाण करणे, स्त्रियांची अब्रू लुटणे, त्यांची बाजू घेऊन भांडणाऱ्यांचे खन करणे, जोडीला आपले लोकशाही हक्क बजावण्यासाठी पोलिसांकडून स्वसंरक्षणाच्या नावाखाली मदत मिळवून अधिक मोठ्या प्रमाणात त्यांच्यावर अत्याचार घडवून आणणे असे प्रकार सत्ताधारी श्रीमंत वर्गांकडून होत आहेत. मध्यप्रदेशातील बस्तर विभागातील बैल्लादिल्ला खाणीमध्ये ३० मार्च १९७८ ला संपावर गेलेल्या मजूरांवर पोलिसांनी जे अत्याचार केले तेही याचे द्योतक आहेत. लाठीहल्ला, गोळीबार, स्त्रियांवरील अत्याचार, घरांना आगी लावणे यासारखे निर्घृणतेच्या बाबतीत एकापेक्षा एक चढे उपाय मजुरांची न्याय्य मागण्यांची चळवळ चिरडून टाकण्यासाठी सरकारकडून योजण्यात आले. कुंपणच शेत खाऊ लागले तर शेत कोण राखणार ? आपला त्राता म्हणून आता गरिबांनी कोणाकडे पहावे.

स्वातंत्र्य मिळाल्याला तीस वर्षे झाली तरी आज भारतामध्ये खरेखुरे प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले आहे असे आपण म्हणू शकत नाही. सरकार निवडून येते ते मूठभर लोकांचे प्रतिनिधित्व करणारे. कायदे होतात ते श्रीमंत वर्गाला पक्षपाती असणारे. त्यांची अमलबजावणी करतानाही त्यांच्याच बाजूने पक्षपात. नागरीस्वातंत्र, लोकशाही हक्क हे सारे त्यांच्यासाठीच. जनसामान्य त्यापासून अजूनही वंचितच राहिले आहेत. जे कोण संघटित होऊन आपल्या हक्कासाठी झगडतात त्यांच्या चळवळी दडपण्याचे प्रयत्न होतात. संघटना बांधण्याच्या त्यांच्या हक्काला मुरड घालण्याचा प्रयत्न होतो. त्यांची संघटनाशक्ती नेस्तनाबूत करण्यासाठी आकाश पाताळ एक केले जाते. लोकशाही हक्क, नागरी स्वातंत्र्य मिळविण्याचे आणि नंतर कायम राखण्याचे साधनच त्यांच्याकडून हिरावून घेण्याचा चंग बांधलेला दिसतो.

दलित, कष्टकरी जनतेवर होणाऱ्या अत्याचारातून स्त्रियांची पण सुटका नाही. या वर्गातील स्त्रीला तर दुहेरीरित्या या अत्याचारांना तोंड द्यावे लागते. दलित कष्टकरी वर्गात ती मोडते म्हणून. शिवाय ती स्त्री आहे म्हणून. स्त्रीला मुक्तपणे समाजात वावरणेही कठीण होते. तिच्यावर बलात्कार होतात. तिच्या अब्रूचे धिंडवडे काढले जातात. कष्टकऱ्यांनी चळवळ

दडपण्याचे एक साधन म्हणून तिच्यावर अत्याचार केले जातात.

पण अशा पद्धतीने दडपू म्हटल्याने कष्टकरी वर्गाचा आवाज दडपला जाणार नाही. दबलेला हुंदका केव्हा तरी बाहेर पडतोच. उलट तो दडपण्याचा जेवढा अधिक ~~प्रयत्न केला जाईल~~-तेवढा तो अधिक गर्जत बाहेर येईल—यात शंका नाही. कष्टकऱ्यांना आता उमगू लागले आहे की आपले संरक्षण आपणच केले पाहिजे. अन्यायाविरुद्ध ठामपणे, स्वाभिमानाने उभे राहिले पाहिजे. संघटित होऊन आपण आपले हक्क मिळविले पाहिजेत. त्यासाठी भांडले पाहिजे. धनिकांकडे, सरकारकडे तोंड वेंगाडून भागणार नाही. जो दुसऱ्यावरती विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला. स्वतःची उन्नती स्वतःच्या प्रयत्नांनी करायला पाहिजे. त्यासाठी आवश्यक असणारे हक्क, स्वातंत्र्य झुंजून मिळवावयाचे. एकीचे बळ, संघटनेचे बळ उभारणे एवढे एकच साधन पिळल्या गेलेल्या घटकांच्या हाती आहे.

स्त्रियांनी पण हीच गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. स्त्रियांवरील अत्याचाराचे, बलात्काराचे मूळ आहे त्यांचे दुय्यम सामाजिक स्थान आणि स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहण्याची समाजाची दृष्टी. ह्या दोन्ही गोष्टींमध्ये बदल घडवून आणायचा तर त्यासाठी चळवळ करायला हवी; स्त्रियांनीही एकजूट केली पाहिजे. संघटना बांधल्या पाहिजेत आणि त्यासंबंधात निरनिराळे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. सुरवात म्हणून कोणत्या प्रकारचा कार्यक्रम शक्य आहे ते बायजाच्या या अंकात आम्ही सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांना, त्या प्रश्नासंबंधी आस्था असणाऱ्या सर्व व्यक्ती आणि संस्थांना तो ग्राह्य वाटेल अशी आशा आहे. त्यांनाही तसा काही कार्यक्रम सुचल्यास आम्हाला अवश्य कळवावा. त्याला आम्ही प्रसिद्धी देऊ. तुमच्या आमच्या सहकार्यानेच स्त्रियांवरील अत्याचाराचा प्रश्न पुढे न्यायचा आहे. त्याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करायचा आहे. आज कष्टकऱ्यांनी दलितांनी, स्त्रियांनी सर्व शोषित घटकांनी स्वसामर्थ्यावर संघटितपणाने अन्यायाचा प्रतिकार करण्यास सिद्ध होणे आवश्यक आहे; त्याला दुसरा पर्याय नाही. □

---

## बैलादिल्ला ! अत्याचाराचा कळस ! !

मध्यप्रदेशातील बस्तर विभागातील एक खाण ! या खाणीतून लोहयुक्त कोळसा मिळतो. हृया कच्च्या लोखंडाची निर्यात होते प्रामुख्याने जपानला. जपानकडून मागणी कमी झाली त्यामुळे सरकारने खाणीतील १४०० कामगारांना नोकरीतून काढून टाकले. कामगार कपातीच्या निषेधार्थ युनियनच्या आदेशानुसार ३० मार्च ७८ पासून स्त्री पुरुष कामगार संपावर गेले. १ एप्रिलला त्यांनी जनरल मॅनेजरच्या ऑफिससमोर निदर्शने केली. या निदर्शकांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. अश्रूधूर सोडला. याबद्दल ' हितवाद ' या रायचूरहून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्राने पुढील वृत्त दिले, "अनेक कामगार, यात काही स्त्रियाही जखमी झाल्या. अटक करून स्त्रियांना पोलिस चौकीत नेले व पोलिसांनी त्यांना नागडे केले. या वार्तेने खाण परिसरातील कामगारात संतापाची लाट उसळली. कंपनीच्या आवारात झोपलेल्या कामगारांवर पोलिसांनी लाठी हल्ला केला. स्त्रियानाही लाठ्यांचा मार बसला." ३ एप्रिलला जनरल मॅनेजरच्या ऑफिसाच्या आवारात पाचशे स्त्री कामगार निदर्शने करीत बसल्या होत्या. त्या आवारातून बाहेर जाण्यास एकमेव दरवाजा होता. तो दरवाजा बंद करून स्त्रियांवर पोलिसांनी बेफाम लाठीहल्ला केला. जीव वाचवण्याच्या घाईत स्त्रियांना कुंपणावरून चढून बाहेर पडावे लागले. तारांमुळे स्त्रिया जखमी झाल्या, त्यांचे कपडे फाटले.

कामगारांचे संपनिदर्शन चालू होते. पाच तारखेला शिस्तबद्ध कामगारांच्या जमावावर गोळीबार करण्यात आला.

टाईम्सच्या रायपूरच्या बातमीदाराने म्हटले आहे "दि. ५ एप्रिलला पोलिस कामगार वसाहतीत गेले व कामगारांच्या झोपड्यांना त्यांनी आगी लावल्या. ज्यावेळी कामगार झोपडीतून बाहेर आले, त्यावेळी त्यांना रेल्वे वॅगनवर बसण्यास सांगण्यात आले व नंतर पोलीसांनी त्यांचेवर गोळीबार केला. पोलिसांनी आगीत अनेकांना ढकलून दिले."

कामगारांनी लढा देऊ नये म्हणून किती क्रूर पद्धतीचा वापर सत्ताधारी वर्गाकडून होतो आहे. मजूर म्हणजे काही किडामुंगी नाही—कसेही यावे चिरडून जावे !